जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०८/२०२४
## दि.०५/०८/२०२४ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केट यार्ड पो स्टे २४१/२०२४,भा.न्या.सं.कलम २८१,१०६(१) |
| **फिर्यादी** | शंकर पवार पोलीस अंमलदार मार्केट यार्ड पोलीस स्टेशन,पुणे. |
| **आरोपीत** | एक रिक्षा चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०७/२०२४ रोजी १९/३० वा.चे दरम्यान राधेकृष्ण ट्रेडिंग कंपनी समोरील रस्त्यावर मार्केट यार्ड पुणे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील रिक्षा ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एका अनोळखी इसमांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.पाटील मो.नं.९९६०४१२२८१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे ३०८/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०५(अ),३३१(३) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३० वर्षे, रा.लेन नं.६ वारजे,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०२४ रोजी स.१०/०० वा.ते दु.१३/४५ वा.चे दरम्याण फ्लॅट नं.३०१, व फ्लॅट नं. १०१, समर्थ हाईटस बिल्डींग, नवचैतन्य सोसायटी, लेन नं.६ वारजे, पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नमुद ठिकाणाचे राहते घराचे लॉक कोणीतरी अज्ञात इसमाने तोडुन घरामध्ये प्रवेश करुन बेडरुममधील लाकडी कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २,४०,०००/- रु.किं.चा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. अस्मिता लाड मो नं ८८३०५९७४४१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ४३३/२०२४, भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३(५),२०४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७४ वर्षे रा.आनंदनगर सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०७/२०२४ रोजी ते आज पावतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील अज्ञात मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना पोलिस असल्याचे बतावणी करुन गैरकृत्य बाबत धाक व दपटशहा दाखवुन संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करुन फिर्यादीची ४९,२०,३५५ /- रु.ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कुंभार मो नं ९९२२९४७३०४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**